**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण)**

**आणि**

**मे. लॅन्को एनर्जी प्रा. लि. (मे. लॅन्को)**

**यांच्यातील वीज खरेदी कराराचा कार्यकारी सारांश**

महावितरण यांनी मे. लॅन्को यांच्याकडून विकसित करण्यात यावयाच्या प्रकल्पातून समग्र विक्रीयोग्य वीज खरेदी करण्यासाठी त्यांच्याशी वीज खरेदी करार केला आहे. मे. लॅन्को हे तीस्ता जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित करीत आहेत व वीज खरेदी करारानुसार प्रकल्पाचे संकल्पन, बांधकाम करून चाचणी, क्रियान्वयन व देखभाल करण्यास तयार आहेत.

<u>**महाराष्ट्रातील वीज स्थिती**</u> :

सध्या महावितरण यांना शिखर मागणीच्या वेळेत ३५०० ते ४५३५ मे.वॉ. तुटवडा भासत आहे आणि ऑक्टोबर ते डिसेंबर २००५ या अल्प काळासाठी खरेदी केलेल्या विजेसाठी, तसेच सांयकालीन शिखर मागणीच्या पूर्ततेसाठी खरेदी केलेल्या विजेसाठी महावितरण यांच्या बसबारला प्रति कि.वॉ. तास करिता अनुक्रमे रू. ४.८२ ते रू. ५.०० व ५.३५ या दराने प्रदान करावे लागले. आणखी असे की, महाराष्ट्र राज्याला उन्हाळ्यात तीव्र वीज टंचाईस तोंड द्यावे लागते आणि ही टंचाई कमी करण्यासाठी मे. लॅन्को यांच्याकडून सिक्कीम राज्यातील तीस्ता या ५०० मे.वॉ. क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पातून विक्रीयोग्य वीज खरेदी करण्यासाठी महावितरण यांनी दीर्घकालीन वीज खरेदी करार केला आहे. सदर प्रकल्प वर्ष् २०११ पर्यंत क्रियान्वित होईल, तोपर्यंत महाराष्ट्रातील विजेचा अंदाजित तुटवडा ३२३२ मे.वॉ. पर्यंत जाईल असा सोळाव्या विद्युत पाहणी अहवालाचा निष्कर्ष आहे. उक्त प्रकल्पातून सुमारे २१२१ द.ल. युनिट वीज पारेषित होऊ शकेल. या प्रकल्पातून उन्हाळ्यात निर्माण केल्या जाणाऱ्या विजेपैकी मोठे परिमाण महावितरण यांना त्याच काळात भासणाऱ्या तुटवड्याच्या परिमाणाशी मिळतेजुळते आहे. मे. लॅन्को यांच्याकडून २१२१ युनिट खरेदी केल्यास महावितरण यांची वार्षिक ५०० कोटी रूपये बचत होईल असे गृहित धरले आहे. आगामी वर्षातील तुटवड्याचे चित्र लक्षात घेता, २५ वर्षे एवढ्या दीर्घकालीन वीज खरेदी करारातील अटीनुसार तिस्ता प्रकल्पातून रू. २.३२/कि.वॉ. तास या स्थिर व सरसकट दराने वीज खरेदी करणे महावितरण यांना आर्थिकदृष्ट्या लाभदायक आहे.

<u>**वीज खरेदी कराराची ठळक वैशिष्ट्ये**</u> :

* **जलविषयक जोखीम** :
  केंद्रीय जल आयोगाने गोळा केलेली १९ वर्षांची जलविषयक आधारसामग्री (डाटा) सविस्तर प्रकल्प अहवालात विचारात घेतली असून सदर अहवाल केंद्रीय जल आयोग व केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांनी मंजूर केला आहे.

* **पुनर्वसन नाही** :
  या प्रकल्पामुळे विस्थापन व पुनर्वसन या समस्या संभवत नाहीत.

* **प्रकल्प खर्चातील वाढ** :
  प्रकल्पाच्या खर्चात काहीही वाढ होणार नाही आणि झालीच तर करारातील अटींनुसार मे. लॅन्को हा खर्च सोसेल.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

* **पर्यावरणाची जोखीम** :
  सदर प्रकल्प पर्यावरणाची जोखीम नसलेल्या क्षेत्रात आकारास येत असून प्रकल्पाचे निरनिराळे घटक भूकंपाच्या झोन-चार क्षेत्रात टिकून राहण्या योग्य असे त्यांचे डिझाईन असेल. वन जमिनीच्या उपयोगाकरिता मे. लॅन्को हे वनखात्याची परवानगी प्राप्त करतील.

* **अपारंपारिक ऊर्जा (ग्रीन एनर्जी)** :
  वीज निर्मिती केंद्रामुळे पर्यावरण दूषित होणार नाही आणि विजेचा दर २०११ मध्ये महावितरण खरेदी करेल त्या अपारंपारिक ऊर्जेच्या (ग्रीन एनर्जी) दरापेक्षा (रू. ४.५५/कि.वॉ. तास) कमी म्हणजे रू. २.३२ कि.वॉ.तास असा असेल.

* **व्याजदरातील तफावत** :
  वित्तीय संस्थाकडून आकारण्यात आलेल्या व्याजाच्या दरात तफावत झाल्यास करारानुसार मे.लॅन्को तो सोसेल.

* **विदेश विनिमय दराची जोखिम** :
  विदेश विनिमय दरात काही तफावत झाल्यास मे.लॅन्को हे करारानुसार समावेशन करून घेतील.

* **वीजदराची संरचना** :
  कराराच्या समग्र कालावधीत प्रकल्प स्वीचयार्डातील बसबारपर्यंत स्थिर दर रू. २.३२/कि.वॉ.तास असेल, महावितरण यांच्या उपकेंद्रापाशी हा दर रू. २.७५/कि.वॉ.तास असा अंदाजित आहे.

**स्वीकार व प्रदान** :

मे.लॅन्को यांच्याशी केलेल्या वीजखरेदी कराराचा आणखी लाभ असा की, घेतलेल्या विजेसाठीच प्रदान करावे लागेल. अन्यथा जलविद्युत केंद्राच्या बाबतीत वीज निर्मिती विचारात न घेता विकासकाकडून वार्षिक स्थिर आकार वसूल केला जातो. प्रस्तुत करारात वार्षिक इंधन खर्चाचे प्रदान करण्याबाबतीत कोणतेही करारबद्ध दायित्व नसल्यामुळे तो महावितरण यांच्याकरिता अतिशय फायदेशीर आहे.

**समन्याय वागणूक** :
वीज खरेदी करार समाप्ती प्रकरणी समन्याय वागणुकीचा अवलंब करण्यात येईल.

**प्रकल्पाचा संक्षिप्त तपशील** :
पर्यावरणदृष्ट्या अनुकूल व प्रदूषणमुक्त असे जलविद्युत प्रकल्प बांधण्याकरिता लॅन्को ग्रुप यांनी लॅन्को एनर्जी प्रा.लि. या कंपनीची स्थापना केली आहे. या कंपनीस सिक्कीम सरकारकडून ५०० मे.वॉ. क्षमतेचा तिस्ता (सहा) जलविद्युत प्रकल्प उभारण्याकिरता ८ एप्रिल २००५ रोजी उद्देशपत्र देण्यात आले. त्यानुसार मे. लॅन्को व सिक्कीम सरकार यांमध्ये ७ डिसेंबर २००५ रोजी कार्यान्वयन करार करण्यात आला.

सिक्कीम राज्यातील तिस्ता जलविद्युत प्रकल्प अखेरच्या टप्प्यात आहे. या प्रकल्पात नदीच्या पाण्याचा दैनंदिन साठा करण्यात येईल व प्रत्येकी १२५ मे.वॉ. क्षमता असलेले चार संच म्हणजे ५०० मे.वॉ. स्थापित क्षमता असेल. हा प्रकल्प, हिमनदीतून उगम पावलेल्या व समुद्र सपाटीपसून ८५०० मीटर उंचीवर असलेल्या तिस्ता नदीवर आहे व त्याचे ठिकाण दक्षिण सिक्कीम जिल्ह्यातील सुबिन खो-यात आहे.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

**ऊर्जा मंत्रालय यांची मार्गदर्शक सूत्रे व राष्ट्रीय वीज दर धोरण यांचे अनुपालन** :

राष्ट्रीय वीज दर धोरण व ऊर्जा मंत्रालय यांनी केलेले स्पष्टीकरण यांनुसार विकासकास पुढील शर्तींच्या अधीन राहून खरेदीदाराशी वीज खरेदी करार करता येईल :

* असा प्रकल्प वितरण कंपनीस ०६.०१.२००६ पूर्वी देऊ केलेला असला पाहिजे.

* वित्तीय संस्थांनी ०६.०१.२००६ अगोदर पासून प्रकल्पाचे आर्थिक मूल्यमापनास आरंभ केलेला असावा.

* प्रकल्पासंबंधी वीजखरेदी करार केलेला असावा आणि वीज खरेदी दाराने सदर करार ३०.०९.२००६ पूर्वी विद्युत नियामक आयोगाकडे दाखल केलेला असावा.

संदर्भित प्रकल्पाकडून, वीज खरेदी संबंधात राष्ट्रीय वीज धोरण व ऊर्जा मंत्रालय यांनी विनिर्दिष्ट केलेल्या आवश्यकतांची वरील अंतिम दिनांकापूर्वी पूर्तता करण्यात आली आहे.

सदर प्रकल्प मेगा विद्युत प्रकल्प म्हणविण्यास पात्र आहे. प्रकल्पाचे आरेखन म.रा.वि.नियामक आयोगाच्या मापदंडांशी जुळणारे आहे आणि वीजदर मेगा विद्युत प्रकल्पाचे फायदे व आयोगाचे मापदंड विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

**प्रकल्प विकासकांनी प्राप्त केलेल निपटारे (Clearance)** :
मे.लॅन्को यांनी सिक्कीम सरकारबरोबर कार्यान्वयन करार स्वाक्षरित केला आहे.

पर्यावरण आणि वन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून पर्यावरण विषयक निपटारा प्राप्त केला आहे.

के.वि.प्राधिकरणाने प्रकल्पाची क्षमता या आधीच मंजूर केलेली आहे आणि तांत्रिक-आर्थिक मान्यतेच्या स्वरूपात प्रकल्पाच्या सुसाध्यतेस त्यांच्याकडून लवकरच मंजुरी देण्यात येईल.

**प्रकल्पाचा खर्च** :
केंद्रिय विद्युत प्राधिकरणास सादर केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाचा बांधकाम काळातील व्याजासहित (IDC) एकूण खर्च २९९६.८९ कोटी रूपये म्हणजे, प्र्रति मे.वॉ. ५.९९ कोटी रूपये असेल.

**करारातील महत्वाच्या अटींचा गोषवारा** :

**करारातील अटी** :
कराराचा प्रांरभिक कालावधी प्रकल्प क्रियान्वित झाल्याच्या दिनांकापासून २५ वर्षे असेल. उभयपक्षी संमत अटींवर हा कालावधी आणखी १० वर्षांपर्यंत म्हणजे, प्रकल्प क्रियन्वित झाल्यापासून ३५ वर्षे अखेरपर्यंत वाढविता येईल.

**विजेची विक्री व खरेदी** :
प्रकल्पातील पहिला संच संकलित केल्याच्या दिनांकापासून कराराचा कालावधी समाप्त होईपर्यंत लॅन्को यांच्याकडून प्रकल्पाच्या बसबार ठिकाणी विक्रीयोग्य वीज (म्हणजे प्रत्यक्ष वीज निर्मिती मधून वीज निर्मिती केंद्रात वापरलेली वीज, पारेषण हानी आणि सिक्कीम सरकारला रॉयल्टी म्हणून द्यावयाची वीज वगळता उर्वरित वीज) देण्यात येईल. वीज खरेदी करारातील अटींनुसार महावितरण यांच्याकडून रू. २.३२/कि.वॉ.तास दराने सदर वीज खरेदी करण्यात येईल.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

वीज खरेदी करारातील तरतुदीचा अपवाद वगळता, महावितरण यांच्या लेखी संमती शिवाय मे. लॅन्को यांना करारबद्ध वीज तिसऱ्या पक्षास देण्यास/विकण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

प्रकल्पातील वीज निर्मिती :
नदीचे पाणलोट क्षेत्र ४५०० चौ.किलो मीटर व कमाल पूर मर्यादा ही ११६०० क्यूसेक्स आहे. प्रकल्पाकडून वार्षिक हिशोबाच्या ९०% आधारावर २४४१ द.ल. युनिट वीज निर्मिती अपेक्षित आहे. मे.लॅन्को यांनी आरंभीची १५ वर्षे १२% वीज व उर्वरित २० वर्षांसाठी १५% वीज सिक्कीम सरकारला रॉयल्टी म्हणून विनामूल्य द्यावयाची आहे.

**वीज विक्री/महावितरण यांनी खरेदी करावयाच्या विजेचा दर** :
मे. लॅन्को यांच्याकडून महावितरण यांना विक्री होणा-या विजेचा दर, आरंभीच्या २५ वर्षांकिरता रू. २.३२/कि.वॅ.तास ्सा निश्चित केला आहे. २५ वर्षांपुढे ३५ वर्षांपर्यंत लागू करावयाचा दर, पंचिवसावे वर्ष संपण्यापूर्वी वाटाघाटी करून ठरविण्यात येईल.

**पूर्ववर्ती शर्ती** :
वीज खरेदी करारात काही पूर्ववर्ती शर्तीचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे व कराराच्या निष्पादन दिनांकपासून १२ महिन्यांत अथवा उभय पक्षी मान्य होईल त्या वाढीव मुदतीत त्या शर्तींची पूर्तता करावयाची आहे.

**त्यापैकी महात्वाच्या काही शर्ती पुढीलप्रमाणे आहेत** :

१) मे.लॅन्को हे प्रकल्पाच्या ठिकाणी जाण्याच्या पोचमार्गाचा हक्क प्राप्त करतील.
२) मे. लॅन्को यांनी पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या मंजुरीसहित आरांभिच्या सर्व संमती प्राप्त करावयाच्या आहेत.
३) मे. लॅन्को यांनी प्रकल्पासाठी वित्तव्यवस्था पूर्ण करावयाची आहे.
४) महावितरण यांनी उचित विद्युत नियामक आयोगाकडून वीज खरेदी करारास मंजुरी मिळवयाची आहे.
५) महावितरण यांनी वीज पुरवठ्यासाठी दीर्घ कालाचा खुला प्रवेश प्राप्त करून घ्यावयाचा आहे.

**वीजनिर्मिती संचाचे संचालन** :
मे.लॅन्को यांनी, वीज खरेदी करारातील त्यांची बांधिलकी सांभळण्याकरिता सर्व संमती व दूरदर्शी उपयुक्तता प्रथांचे पालन करण्यासाठी भारतीय विद्युत ग्रीड कोडनुसार प्रकल्पाचे संचालन व सांभाळ होत आहे याची स्वखर्चाने खबरदारी घ्यावयाची आहे.

**विजेचे निष्कासन (Evacuation)** :
मे. लॅन्को यांनी आंतरबंधन बिंदू पर्यंत आंतरबंधन सुविधा व पारेषण वाहिन्या यांचे संकल्पन, बांधकाम, क्रियान्वयन, संचालन व देखभाल यांसाठी लागणा-या खर्चाचे समावेशन करण्यास मान्यता दिली आहे. महावितरण यांनी केंद्रीय पारेषण उपक्रमाबरोबर पुंज स्वरूपात पारेषणासाठी करार करण्याचे प्रस्तावित केले आहे व त्यादृष्टीने त्या उपक्रमाशी बोलणी चालू आहेत. पुढे असे की, निर्माण केलेल्या विजेचे निष्कासन सुलभपणे करता यावे याकरिता महावितरण यांना सदर उपक्रमाबरोबर जोडणी करार (कनेक्शन करार) करावा लगेल व त्यामध्ये मे. लॅन्को हे एक पक्षकार असू शकतात

**क्रियान्वयनास विलंब प्रकरणी** :
वित्तव्यवस्था पूर्ण झाल्यापासून ५ वर्षे ह्या वाणिज्यिक तत्वावरील संचालन दिनांकापलीकडे प्रकल्पाच्या क्रियान्वयनास मे. लॅन्को यांच्याकडून कोणात्याही प्रकारे विलंब झाल्यास त्यांनी महावितरण यांना खुल्या पारेषण प्रवेशासाठी केलेल्या सर्व खर्चाची प्रतिपूर्ती करावयाची आहे. महावितरण यांच्याकडून झालेल्या विलंब प्रकरणी, महावितरण यांनी मानीव (Deemed) वीजनिर्मिती आकार द्यावयाचा आहे.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

**मानीव (Deemed) वीज निर्मिती :**
केंद्रिय पारेषण पद्धतीमधील बिघाडाव्यतिरिक्त कोणत्याही कारणास्तव मे.लॅन्को यांनी निर्माण केलेली वीज उचलण्यास महावितरण अपयशी ठरल्यास घोषित वीज उठावाच्या ९५% पेक्षा महावितरण जेवढी कमी वीज उचलतील आणि राहिलेली वीज मे. लॅन्को हे त्रयस्थ पक्षास विकू शकत असतील तर केवळ अशाच प्रकरणी महावितरण यांनी मानीव वीज निर्मिती आकार प्रदान करावयाचा आहे. तसेच, अशा प्रकरणी तिसऱ्या पक्षकारास ९५% पर्यंतची वीज दिल्यामुळे नफा मिळाल्यास तो महावितरण व मे. लॅन्को हे समप्रमाणात वाटून घेतील.

वीजवहन जाळ्यातील बिघाडामुळे किंवा खुल्या पारेषण प्रवेशाची उपलब्धता नसल्यामुळे महावितरण यांना करारबद्ध विजेचा खरेदी करता आला नाही तर मे.लॅन्को हे निर्माण केलेली वीज तिस-या पक्षाकारास विकू शकतात. अशा पक्षाकाराकडून मिळालेला दर महावितरण यांच्याशी ठरवलेल्या दराहून कमी असल्यास महावितरण यांच्याकडून दरातील फरकाची भरपाई रक्कम घेण्यात येईल. तसेच तिस-या पक्षकारास विजविक्री केल्यामुळे नफा झाल्यास त्याची रक्कम महावितरण व मे. लॅन्को यांच्यात समसमान वाटून घेण्यात येईल.

**बिलाचे प्रदान** :
बिल सादर केल्यापासून ३० दिवसांत प्रदान करण्यात येईल.

**प्रदान प्रतिभूती** :
प्रदान प्रितभूती कार्यतंत्राच्या उद्देशाने, वीज खरेदी करारानुसार महावितरण यांनी मंथली डिफॉल्ट एस्क्रो सुविधेसह परिक्रामी व रद्द न करता येण्याजोग्या पतपत्राची व्यवस्था करावयाची आहे. महावितरण यांनी पहिल्या संचाच्या वाणिज्यक संचालन दिनांकापूर्वी किमान ३० दिवस अगोदर एस्क्रो अकाउंटसहित पतपत्र उघडावयाचे असून त्याच्या मुदतसमाप्तीपूर्वी ३० दिवसांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीत त्याचे नुतनीकरण करावयाचे आहे.

**उशिरा प्रदान** :
उशिरा प्रदानाच्या बाबतीत विलंब झालेल्या कालावधीसाठी केंद्रिय विद्युत नियामक आयोगाकडून वेळोवेळी जाहीर करण्यात येईल त्या दराने (सध्या हा दर मासिक १.२५% आहे) विलंब प्रदान अधिभार म्हणून व्याज लावण्यात येईल.

**कायद्यातील बदल** :
कायद्यातील कोणत्याही बदलाची परिणिती कॉर्पोरेट आयकर किंवा अन्य कोणतेही कर, अधिभार यांमध्ये बदल होण्यात झाली तर त्या बदलामुळे वीजदरावर होणारे परिणाम वीजदरात समयोजित करण्यात येतील.

**कसूरआणि समाप्ती प्रकरणी** :
मे.लॅन्को यांच्याकडून संभाव्य कसूर :

१) मे. लन्को यांनी चार महिन्याच्या आत प्रकल्प आरंभ करण्यास वाजवी प्रयत्न केले नाही
२) वाणिज्यिक संचालनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांत निर्धारित क्षमता प्रत्यक्षात आणण्यात अपयश.
३) वीज खरेदी करारातील तरतुदींचे उल्लंघन करून मे. लॅन्को हे त्यांची मालमत्ता किंवा अधिकार यांचे हस्तांकन करतील किंवा हस्तांकनाचा उद्देश असेल.

**महावितरण यांच्याकडून संभाव्य कसूर :**
१) महावितरण हे देय दिनांकापासून ६० दिवसांत मासिक बिले आणि/किंवा पूरक बिले यांचे प्रदान करण्यात अपयशी ठरतील,
२) करारातील तरतुदीनुसार महावितरण पतपत्राचे नुतनीकरण करणे आणि/किंवा एस्क्रो अकांऊट सांभळणे यांबाबतीत कसूर करतील.
३) करारातील तरतुंदीनुसार महावितरण यांचे विसर्जन किंवा हक्काचे/बांधिलकीचे हस्तांतरण.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

**समाप्ती** :
मे.लॅन्को यांच्याकडून समाप्ती करण्यात आल्यास :

* बांधकाम कालावधीत केंद्रिय पारेषण उपक्रमासोबत पुंज (bulk) विद्युत पारेषण, तसेच कनेक्शन करार याखालील महावितरण यांची सर्व बांधिलकी व जबाबदा-या मे. लॅन्को यांच्याकडे अभिहस्तांकित करण्यात येतील.

* वाणिज्यिक संचालन दिनांकानंतर समाप्तीच्या नोटिशीसोबत महावितरण हक्कदार असलेल्या रू. ५०००.०० दशलक्ष रकमेच्या पतपत्र परतीचे आवाहन असेल.

**महावितरण यांच्याकडून समाप्ती करण्यात आल्यास** :

* बांधकाम कालावधीत कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय, केंद्रिय पारेषण उपक्रमाबरोबर केलेल्या पुंज पुरवठा करार व कनेक्शन करार यांतील खुल्या प्रवेशाचे मे. लॅन्को हक्कदार होतील.

* वाणिज्यिक संचालन दिनांकानंतर समाप्तीच्या नोटीशीसोबत मे. लॅन्को हे हक्कदार असलेल्या रू. ५०००.०० दशलक्ष रकमेच्या पतपत्र परतीचे आवाहन असेल.

**विवाद सोडविण्याचे कार्यतंत्र** :

१) दोन्ही पक्ष त्यांच्यातील विवाद सलोख्याने मिटवण्याकिरता कराराच्या दैनंदिन अंमलबजवणीशी संबंधित नसतील अशा दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ अधिका-यांच्या मध्यस्थीचा व समेटाचा उपयोग करतील. त्याद्वारे विवादाची सोडवणूक न झाल्यास -

२) सदर विवाद सांविधिक तरतुदींनुसार म.रा.वि.नियामक आयोगाकडे नेण्यात येईल.
३) नियामक आयोग संमजसपणे विवादाचा निर्णय करील अथवा ते प्रकरण लवाद व समेट अधिनियम १९९६ यानुसार लवाद न्यायाधिकरण यांच्याकडे निर्देशित करील.

सदर करारातून उद्‌भवणा-या किंवा त्याच्याशी संबंधित सर्व प्रकरणी मुद्यांबाबत/मुंबई न्यायालयांना अनन्य अधिकारिता असेल.

**अभिगस्तांकन** :
मे.लॅन्को यांना केवळ धनकोंच्या नावाने वीज खरेदी करार हस्तांकित करण्याचा अधिकार असेल.

**वीज खरेदी करारामुळे महावितरण यांना मिळणारे लाभ व फायदे** :
मुख्य फायदा म्हणजे, महाराष्ट्राला जास्तीत जास्त वीज (विशेषतः उन्हाळ्यात) पाहिजे असते तेव्हा या प्रकल्पातून वीज निर्मिती होईल. कोणत्याही वर्षी या प्रकल्पाकडून सुमारे ६०% वीजपुरवठा महाराष्ट्रातील कमाल मागणी काळात मिळेल.

**स्थिर व सरसकट दराने स्वस्त वीज** :
करारानुसार महाराष्ट्राला २५ वर्षे रू. २.३२/युनिट या स्थिर व सरसकट दराने स्वस्त वीज मिळेल.



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

**विजेच्या प्रतिक्षेतील महाराष्ट्राला विजेची उपलब्धता** :

५०० मे.वॅ. क्षमतेच्या या जलविद्युत प्रकल्पातून वीज निर्मिती केंद्रात वापरलेली वीज आणि रॉयल्टी म्हणून सिक्कीम सरकारला विनामूल्य द्यावयाची वीज वजा जाता उर्वरित विक्रीयोग्य वीज महाराष्ट्राला २५ वर्षे मिळत राहील आणि पंचविसाव्या वर्षी दरावद्दल वाटाघाटी करून आणखी दहा वर्षे वीज मिळवण्याचा अधिकार असेल.

सदर प्रकल्प वर्ष २०११ मध्ये वाणिज्यिक तत्वावर कार्यरत होईल व त्या वर्षापासून महाराष्ट्राला अतिरिक्त वीज मिळू लागेल. ज्यावेळी पुवठ्यात ३२३२ मे.वॅ.ची कमतरता भासेल असा अंदाज आहे.

**वीज करार** :

हा करार थेट ऊर्जा करार आहे आणि थेट वीज निर्मितीशी जोडला आहे. तसेच वीज निर्मितीतील बदलामुळे या दरात कोणताही बदल होणार नाही. तसेच, वीज निर्मितीसाठी मे. लॅन्को यांना कोणतेही स्थिर आकार देय नाहीत.

**कमी जोखीम** :

महावितरण यांच्यावर जलविषयक आणि पर्यावरण जोखिम यांसंबंधाने कोणताही अतिरिक्त आर्थिक भार नाही. प्रकल्प खर्चात वाढ झाल्यास ती मे.लॅन्को यांनी सोसावयाची आहे.

**समन्यायी व समतोल करार** :

महावितरण व मे. लॅन्को यांमध्ये करण्यांत आलेला वीज खरेदी करार हा समन्यायी व सुवर्णमध्य साधणारा करार आहे.

* * * * *



Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com